नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०८/२०२६ ( गुरूवार )**

---

# इलेक्ट्रीक पोलवरील कंडक्टर वायर चोरीचा गुन्हा उघड
# एकूण ०७ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त
# वडोदा पोलीसांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात वडोदा पोलीसांनी सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून चोरीचे ५ गुन्हे उघड केले आहे.

पोलीस स्टेशन वडोदा येथील अप. क्र. २५९/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. चे तपासादरम्यान घटनास्थळाचे आजूबाजूचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता घटनेवेळी एक संशयित बोलेरो पिकअप वाहन व पाच ते सहा इसम यांनी सदरची चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून सदर बोलेरो पिकअप गाडीचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेतला असता दिनांक १०/०८/२०२६ रोजी सदरचे वाहन वाठोडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बीडगाव या गावामध्ये मिळून आले. त्यावरून सदर परिसरामध्ये माहिती घेतली असता सदरचे वाहन **आरोपी नामे मुन्ना राशिद खान, राहणार बिडगाव तालुका कामठी जिल्हा नागपूर** याचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून सदर आरोपीस चौकशीकामी दिनांक १०/०८/२०२६ रोजी ताब्यात घेतले व त्याला सदर गुन्ह्यात अटक करून दिनांक १३/०८/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी घेऊन त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यानी त्याचे इतर साथीदार नामे १) दरोगा नगीना बिंद, वय ३२ वर्ष, राहणार निबियाराड, थाना जैनपूर, जिल्हा कैमुर, राज्य बिहार २) लक्ष्मण कुमार फुलवासी बिंद वय २४ वर्ष राहणार पलादपूर, पोस्ट चौनपुर, जिल्हा कैमुर, राज्य बिहार ३) सुनील कुमार फुल वाशीबिंद वय २८ वर्ष राहणार पलादपूर, पोस्ट चौनपुर, जिल्हा कैमुर, राज्य बिहार ४) ब्रह्मानंद भगवान आंबोने, वय २८ वर्ष, राहणार बीडगाव, तालुका कामठी, जिल्हा नागपूर यांनी आपसी संगणमत करून गुन्हा केल्याचे तपासात कबूल केले आहे. आरोपीतांकडुन चोरी गेलेला सुमारे १५० किलो कंडक्टर ॲल्युमिनियम तार किंमती ५५,०००/—रूपये, गुन्ह्यात वापरलेले वाहन, ०५

ॲडरॉईड मोबाईल, ईतर साहित्य असा एकूण ७,५५,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींनी नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये पोलीस स्टेशन पारशिवनी, पाचगाव, भिवापूर या ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. त्यावरून तांत्रिक विश्लेषण केले असता त्यांच्याकडून पुढील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**उघड झालेले गुन्हे**

१) पोलीस स्टेशन पारशिवानी अपराध क्रमांक ४९६/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

२) पोलीस स्टेशन पाचगाव अपराध क्रमांक २१७/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

३) पोलीस स्टेशन पाचगाव अपराध क्रमांक ६५/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

४) पोलीस स्टेशन पाचगाव अपराध क्रमांक १०७/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

५) पोलीस स्टेशन भिवापूर अपराध क्रमांक ४५२/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.



# बेला पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन बेला हद्दीतील अवैध दारू व्यवसायात सक्रिय आरोपी १) संजय वामनराव लांबट, वय ४५ वर्ष, रा. शेडेश्वर कॉलनी बेला, ता. उमरेड, जि. नागपूर आाणि २) प्रभुलाल मुन्नालाल जैस्वाल, वय ३८ वर्ष, रा. बेला ता. उमरेड, जि. नागपूर यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांनी हद्दपार केले.**

वर नमुद आरोपी यांचेवर अवैध दारू विक्रीचे अनेक **गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद अवैध दारू व्यवसायात सक्रिय गुन्हेगारांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव बेला पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यांना **३ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**संजय वामनराव लांबट**



**प्रभुलाल मुन्नालाल जैस्वाल**

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, १२ लाख ९८ हजार २४ रूपयांचा मुद्देमाल जप्त खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :– दिनांक १२/०८/२०२६ रोजी खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिति मिळाली की, महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखुची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांच्या मार्गदर्शनात खापा पोलीसांनी जवाहर टी पॉईंट येथे सापळा रचत कारवाई केली असता आरोपी नामे १) शाहीद मन्सुरी रफीक मन्सुरी, वय ३४ वर्षे, रा. वार्ड नं. १५, बांका नागनपूर, ता. चांदचौराई, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश, क्लीनर नामे २) राजा जंगलसी धुर्वे, वय २८ वर्षे, रा. इंदीरा नगर छिंदवाडा, जिजा गणेश कुमरे यांचे घरी, मध्यप्रदेश हे चारचाकी वाहन क्र. एम. पि.–२२/जी–३००६ सह मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्यांचेजवळ महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण वजन २६२.५५४ किग्रॅ किंमती २,८८,०२४/– रूपये, चारचाकी वाहन क्र. एम. पि.–२२/जी–३००६ किंमती १०,००,०००/– रूपये, ०१ मोबाईल किंमती १०,०००/–रूपये असा एकुण १२,९८,०२४/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने वाहतूक करताना मिळुन आले. **आरोपी नामे १) शाहीद मन्सुरी रफीक मन्सुरी, वय ३४ वर्षे, रा. वार्ड नं. १५, बांका नागनपूर, ता. चांदचौराई, जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश क्लीनर नामे २) राजा जंगलसी धुर्वे, वय २८ वर्षे, रा. इंदीरानगर छिंदवाडा, जिजा गणेश कुमरे यांचे घरी, मध्यप्रदेश** यांचेविरूद्ध पोस्टे खापा येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १२/०८/२०२६ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीतील मस्के ले आउट कांद्री कन्हान येथे राहणारा दिनदयाल रामदास बावणकुळे यानी आपले राहते घरी अवैधरीत्या शस्त्र बाळगुन ठेवलेले आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता आरोपी नामे दिनदयाल रामदास बावणकुळे, वय ५२ वर्षे, रा. मस्के ले आउट, वार्ड क्र. ०३, कांद्री बस स्टॉप कांद्री, ता. पारशिवनी याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून समोरील रुम मध्ये एका लाकडी दिवाणाखाली **एक लोखंडी धारदार तलवार** मिळुन आली. सदर धारदार शस्त्रांच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक लोखंडी धारदार तलवार किंमती १०००/— रूपये असा एकुण १०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.**

# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १२/०८/२०२६ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता अर्जुन नगर बौध्द विहार मागे **आरोपी नामे भुषन जिवन राउत, वय ३५ वर्ष, रा. अर्जुन नगर काटोल ह. मु. सोनक अंबाडा काटोल, जि. नागपुर** हा अंधारात आपले अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्याची विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १४ गुन्हे नोंद

दिनांक १२/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७,५७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी प्रविण पुंडलीक दहेलकर, वय ४५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, केळवद ता. सावनेर जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे शालीकराम नारायनराव वांगरुके, वय ७० वर्ष, रा. टेभुरढोह, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे शांतनु विलास चौधरी, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, भिवापुर ता. भिवापुर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे महिला आरोपी नामे हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) प्रदिप भिमराव राठोड, वय २७ वर्ष, रा. नाळ शिवनफळ २) चंद्रशेखर भगवान चाचेरकर, वय ३१ वर्ष, रा. गंगापुर उमरेड यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे रोहीत रणधिर शंभरकर, वय २४ वर्षे, रा. चिखलापार, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी मनिराम गुणवंत काकडे, वय ५५ वर्ष, रा. बोरखेडी रेल्वे, ता. जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी शरद दिगांबर रक्षित, वय ४० वर्ष, रा. घरतवाडा, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी १) विजयसिंग जतनसिंग भोंड, वय ५० वर्ष, रा. बानोरचंद्र, ता. नरखेड, जि. नागपूर २) जितेन्द्र सिध्दार्थ तायडे, वय ३४ वर्ष, रा. मदना, ता. नरखेड, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी १) लखन नजरू खडसे, वय ३५ वर्ष, रा. एम जी नगर कन्हान २) रमेश निनकु उर्फ टिकु सहानी, वय ३५ वर्ष, रा. शिवनगर कांद्री यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी धनराज सुखदास मडावी, वय ३२ वर्ष, रा. चारगाव तह. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद.

मा. पोलीस अधिक्षक

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने